# महाराष्ट्र राज्य : सर्पमित्रांसाठी मार्गदर्शक तत्वे / आचारसंहिता

**पार्श्वभुमी :**

सर्प मित्र ही संकल्पना महाराष्ट्रात चांगलीच रुजली असून, राज्याच्या बहुतांश गावांमध्ये सर्पमित्र कार्यरत आहेत. साधारणतः तरुण / किशोर वयातच एखाद्याचा सर्पमित्र बनण्याचा प्रवास चालू होतो. काळाच्या ओघात अनेक वेळा सोशल मिडिया व प्रसिद्धीच्या नादाने सापांशी खेळ करणे, स्टंटबाजी याकडे अनेकांचा कल झुकतो. या नादात थेट जीव गमवावा लागलेलीही अनेक उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात. सर्वच साप धोकादायक नसून सापांची पर्यावरणातील भुमिका अतिशय महत्वाची आहे, उंदरासारखे प्राणी जे मोठया प्रमाणात धान्य फस्त करतात व त्याबरोबरच ते लेप्टोस्पायरोसीस सारख्या जीवघेण्या आजाराचाही प्रसार करतात, ते खाऊन साप एकप्रकारे त्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवत असतात,त्याचबरोबर बेडुक ,पाली, पक्षी इत्यादीही सापाचे भक्ष असतात व त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखायला साप उपयोगी ठरतात याबाबत सामान्य जनतेला शिक्षित करणे आवश्यक आहे.

सामान्यतः सापांना माणूस प्रचंड घाबरतो, त्यामुळे जो कोणी या प्राण्याला हाताळण्यात प्रवीण असतो, तो साहजिकच जनसामान्यांत प्रसिद्ध होतो. या प्रसिद्धीमुळे बहुधा अशा सर्पमित्रांवर कडक कारवाई करून, वन्यजीव संरक्षण कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे अवघड जाते. अनेक वेळा, शासकीय यंत्रणेत सर्प हाताळणारे तज्ञ नसल्यामुळे, हि यंत्रणा साप वाचविण्यासाठी सर्पमित्रांवरच अवलंबून असते, त्यामुळेही स्थानिक पातळीवर कायद्याच्या अंमलबजावणीत मर्यादा येतात. सर्प मित्र आणि वन विभागाच्या दरम्यान ब-याच काळापासून एक गंभीर अभाव दिसत आहे म्हणून मार्गदर्शक .सुचना बनविणे आवश्यक बनले आहे.

**२. व्याप्ती :**

या व सर्पमित्रांनाच झालेल्या जीवघेण्या सर्पदंशा सारख्या काही घटनांच्या पार्श्वभुमीवर, सदर मार्गदर्शक तत्वे क्षेत्रीय अधिकारी, सदर क्षेत्रात अनुभवी स्वयंसेवक व स्वयंसेवी संघटना यांचेशी सखोल विचारविमर्ष करून तयार करण्यात आलेली आहे. ही तत्वे / आचारसंहिता, यांची व्याप्ती अतिशय मर्यादित असून ती केवळ सर्प बचाव व पुनर्वसन या पुरतीच आहे. यामध्ये सर्प विष संकलन, प्रति सर्पविष औषधी निर्मिती किंवा सर्पविष अथवा अवयवांचा अवैध व्यापार याचा समावेश नाही. वन्यजीव संरक्षण कायद्यात या सर्व बाबी समाविष्ट असून त्यानुसार संबंधीत क्षेत्राचे वन विभागाचे प्राधिकृत अधिकारी यांच्या अखत्यारीत कारवाई होऊ शकते.

**३. उद्दिष्टे :**

i) वन खात्याच्या स्थानिक कार्यालयांद्वारे सर्प बचाव कार्याचे नियमन करणे व स्थानिक पातळीवर जबाबदार सर्पमित्र घडवणे

ii) वन खात्याकडे सर्पमित्रांनी जमा करावयाच्या नोंदींसाठी अधिकृत मानक नमुना तयार करणे

**४. मार्गदर्शक तत्वे / आचारसंहिता :**

**I) सर्पमित्र पात्रता**

i) सर्प संरक्षण स्वयंसेवक होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने स्थानिक उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी कार्यालयात विहित नमुन्यात (परिशिष्ट-२) अर्ज करावा. अर्ज प्राप्त झाल्यावर संबंधित अधिकारी

आपले समाधान झाल्यावर त्याचे नांव सर्प संरक्षण स्वयंसेवक याच्या यादीत समाविष्ठ करतील व जनतेच्या माहितीसाठी जारी करतील.

ii) सर्प संरक्षण स्वयंसेवक होऊ इच्छीणा-या व्यक्ती सर्प विषयक शास्त्रीय ज्ञानअसलेला व अनुभव असलेला असावा.

iii) सर्प संरक्षण सेवकानी फक्त सर्प पकडण्याचे काम न करता जनतेत सर्प निसर्ग संवर्धनासाठी किती आवश्यक आहे याबाबत जन जागृती निर्माण करण्यासाठी सतत कार्यरत असणे आवश्यक राहील.

iv) नोंदणीकृत सर्प मित्रांना वन विभागाद्वारे त्यांच्या सेवांसाठी कोणतेही पारिश्रमिक दिले जाणार नाही, कारण हे बचाव कार्य स्वेच्छेने केले जातातततथापि ., सर्पांना बचाव करतांना केलेल्या प्रत्यक्ष खर्चाची परतफेड केली जाऊ शकते.

**II) सर्प बचाव करण्यापुर्वी :**

i) सर्प बचाव खरोखरच आवश्यक आहे का ? याचे मुल्यांकन. अनेक वेळा साप किंवा माणूस या पैकी कोणालाही थेट धोका नसून केवळ साप आढळल्याने घबराटीचे वातावरण झालेले असते. अशा वेळी साप स्वतःहून तेथून सुरक्षित निघून जाईपर्यंत थांबावे. बचाव प्रक्रियेचे निर्णय कसे घ्यावे या विषयीचा क्रमवार आलेख परिशिष्ट १ मध्ये सोबत जोडला आहे.

ii) माहिती गोळा करणे

अ) फोन करणा-या व्यक्तीला (कॉलरला) आश्वसत करा व त्याला शात राहण्यासाठी सांगा.

ब) जर आलेला फोन आपण घेऊ शकत नसल्यास तर सदर फोन तात्काळ दुस-या सर्प मित्राला हस्तांतरीत करा.

क) सर्पाचे वर्णन तसेच ज्या क्षेत्रामध्ये तो आढळला आहे त्याची माहिती घ्या.

ड) स्थान शोधून काढण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी पत्ता आणि जवळपास, प्रमुख महत्त्वाचे स्थानाचा खूण नोंदवा कॉलरचे संपर्क तपशील रेकॉर्ड .करून घ्यावे.

iii) फोन करणा-या व्यक्तीला द्यावयाची सुचना

अ) बचाव क्षेत्रात पोहचेपर्यंत कॉलरनी काय करावे याबाबत आवश्यक ते निर्देश द्यावे.

ब) जरी सर्प हालचाल करीत असेल तर काही अंतर ठेऊन सापाचे हालचालीवर देखरेख ठेवावी.

क) सापाला पकडण्याचा किंवा मारण्याचा प्रयत्न करू नये याबाबत कॉलरला समजुन सांगावे.

ड) जर साप आराम करीत असले तर सापाला त्रास देऊ नका असे सांगा.

ई) जो सापाच्या हालचाली निगा ठेवत आहे त्या व्यक्तीशिवाय सर्वांनी साप असलेल्या क्षेत्रापासून दुर राहावे.

फ) सर्प मित्राला घटनास्थळी पोहचण्यासाठी किती वेळ लागेल याची कल्पना कॉलरला द्या.

**III) बचाव कार्याच्या वेळी करावयाची बाबी.**

i) घटनास्थळी करावयाची कार्यवाही.

अ) क्षेत्र मोकडा करण्यासाठी उपस्थित सर्व लोकांना सुचना द्या.

ब) योग्य प्रकाश उपलब्ध आहे याची खात्री कराआवश्यक असल्यास ., प्रकाशची व्यवस्था करा.

क) हाताळणी उपकरणे आणि संबंधित उपकरणे आणि वैयक्तिक संरक्षण उपकरणे तपासा. बवाच कार्य सुरू करण्यापुर्वी सर्व आवश्यक साधने तयार ठेवा.

ड) परिस्थितीचे मूल्यांकन करा आणि निर्णय घ्या की हे हस्तक्षेप करणे आवश्यक आहे किंवा नाही.

ई) मार्गदर्शक सुचनेनुसार सर्प पकडण्याची कार्यवाही करा.

ii) ज्यावेळी खरोखरच साप पकडणे अत्यावश्यक असेल तेव्हा प्रशिक्षणामध्ये शिकवलेल्या सुरक्षित पद्धतींचा अवलंब करत साप कापडी पिशवीत पकडावा व ती पिशवी हाताळण्यास/वाहतुकीस योग्य अशा कंटेनर अथवा खोक्यात ठेवावी. सुनियोजित बचाव पद्धतीमुळे साप व सर्पमित्र दोघांनाही सुरक्षित राहण्यास मदत होते.

iii) आवश्यक अशा (hooks/tongs/tubes/pipes) साहित्यांचा वापर करणे सुरक्षेसाठी गरजेचे आहे.

iv) जखमी साप, नुकतेच खाद्य भक्षण केलेला साप अशा काही विशिष्ठ परिस्थितीमध्ये विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. अशा वेळी सापाला कमीत कमी हाताळणे तसेच हुक किंवा टोंग न वापरता गडद रंगाच्या कापडी पिशव्या व पाईप/ट्यूब वापरून साप पडणे गरजेचे आहे.

v) शक्यतो नेहमी किमान दोन सर्पमित्रांनी एकत्र कॉल वर जावे. साप कमीत कमी हाताळावा (शक्यतो फक्त दोनदा एकदा पकडताना व दुसऱ्यांदा सोडताना)

vi) प्रत्यक्ष बचाव करताना व्हिडीओ शुटींग, फोनवर किंवा इतरांशी बोलणे ई. न करता बचाव कार्यावरच लक्ष केंद्रित करावे.

vii) जागेवर जमलेल्या गर्दीला दूर सुरक्षित अंतरावर थांबवावे जेणेकरून कोणताही दुर्दैवी अपघात होणार नाही.

viii) जमलेल्या गर्दीला पकडलेल्या सापाविषयी माहिती देऊन, त्याचा अधिवास आणि वावर आदी गोष्टी सांगून सापांबरोबर सहचार्याने कसे राहता येईल याविषयी प्रबोधन करावे.

**ix) कोणत्याही परिस्थितीत दारू पिऊन / प्यायलेल्या अवस्थेत सर्प बचावासाठी अजिबात जाऊ नये.**

**IV) सर्प सोडताना करावयाच्या / न करावयाच्या बाबी**

i) जर साप निसर्गात सोडण्यासाठी योग्य असेल तर असे साप शक्य तितक्या लवकर, २४ तासांच्या आत, स्थानिक सर्प पुनर्वसन धोरणानुसार, वनखात्याच्या मार्गदर्शनाखाली निसर्गात मुक्त करावा.

ii) सर्प बचाव व पुनर्वसन यांच्या नोंदी विहित नमुन्यात (परिशिष्ट-३) ठेवाव्यात. (शक्य असल्यास बचाव करण्याआधी किंवा नंतर प्रत्यक्ष जागेवरील छायाचित्र, जेणेकरून अधिवास ओळखण्यास मदत होईल)

iii) बिनविषारी साप असेल तर मानवी अधिवासापासून थोडेसे दूर परंतु प्रत्यक्ष साप पकडलेल्या जागेच्या शक्य तितक्या जवळ साप सोडण्याचा प्रयत्न करावा.

iv) विषारी साप सोडण्याबाबत, वन खाते व स्थानिक सर्पमित्र यांनी स्थानिक परिस्थितीचा अभ्यास करून काही ठराविक जागा निश्चित कराव्यात. या जागा नियमितपणे, साधारणतः ३० दिवसांच्या अंतरात, बदलल्या जाव्यात.

v) साप सोडताना त्याच्या नैसर्गिक वावराच्या वेळेनुसार, म्हणजेच निशाचर साप हे रात्री तर दिनचर साप हे दिवसा सोडले जावेत. भर दुपारी कडकडीत उन्हात साप सोडू नयेत. साप पकडल्यानंतर तात्काळ निसर्गात मुक्त करण्यात यावे.

vi) **कोणत्याही परिस्थितीत दारू पिऊन / प्यायलेल्या अवस्थेत सर्प सोडण्यासाठी अजिबात जाऊ नये.**

**५) हे करू नये**

i) वैद्यकीय उपचारा व्यतिरिक्त साप स्वतः जवळ बाळगणे. (जर वैद्यकीय उपचारांची गरज असेल तर असे उपचार वनखात्याच्या परवानगीने व त्यांच्या मार्गदर्शनाखालीच करावेत)

ii) कोणत्याही कारणासाठी जिवंत सापांचे प्रदर्शन करणे. ही बाब काटेकोरपणे टाळलीच पाहिजे. कोणताही सर्पमित्र असे करताना आढळल्यास वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार त्यावर उचित कारवाई केली जाईल.

iii) सापांना गरज नसताना हाताळणे (यामुळे सापावर अनावश्यक ताण येऊन क्वचित प्रसंगी निव्वळ ताणामुळेही सापाचा मृत्यू होऊ शकतो)

**६) महत्वाचे मुद्दे**

i) विषारी सर्पदंश झाल्यास करावयाच्या प्रथमोपचाराची पूर्ण माहिती असणे अत्यावश्यक आहे, तसेच **"सर्पमित्र सुरक्षा कार्ड"** (परिशिष्ट-४) कायम जवळ बाळगावे.